मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपाचे नवनाथ ढवळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

## पुनावळेकरांच्या सोयी-सुविधेसाठी मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय सोयीचे ठरणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

परिसरातील नागरिकांना सोयी-सुविधा, त्यांच्या समस्यांचे निवारण तसेच निवडणुकीच्या दृष्टीने ईला हौसिंग सोसायटी या ठिकाणी मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. भाजपाचे चिंचवड विधानसभा प्रमुख काळुराम बारणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राम रामायणाचार्य,महावीर महाराज सूर्यवंशी, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, किशोर चित्राव, अजय ओव्हाळ, सुरेश रानवडे. सुनिल ढवळे,किशोर चित्राव, पंडिता, अशोक कटारे, राजू काटे, प्रधान काटे, संत काका, ज्ञानदेव काटे, दत्तात्रय ढवळे, बाळासाहेब बोडके, रामदास काटे, जालिंदर काटे, अशोक काटे, बाळासाहेब काटे, संतोष काटे, भरत काटे, रोहिदास बोरगे, शेखऱ गोरगले, पुनावळे परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

> पुनावळे परिसरातील जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहण्यासाठी हे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय केले आहे. विकासासाठी अहोरात्र सेवेत ही संकल्पना मनी बाळगून हे जनसंपर्क कार्यालय स्थापन करून पुनावळेकरांच्याच उपस्थितीत उद्घाटन केले आहे. परिसरातील नागरिकांसाठी लागणाऱ्या आवश्यक गोष्टी, सोयी-सुविधांबद्दलची माहिती या ठिकाणी उपलब्ध राहील.
>
> **- नवनाथ ढवळे, भाजपा उपाध्यक्ष.**



---

# लिफ्ट ऑडिट कामकाजाचे जिल्हास्तरावर विकेंद्रीकरण- आमदार शंकर जगताप

## लिफ्ट दुर्घटनांबाबत आमदार शंकर जगताप यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले

**पिंपरी | प्रतिनीधी**

पुणे जिल्हा आणि परिसरामध्ये वारंवार लिफ्ट दुर्घटना घडत आहेत. गृहप्रकल्पांमधील उदवाहन (लिफ्ट) अपघातांबाबत आमदार शंकर जगताप यांनी भोसरी चोवीसावाडी येथे दसऱ्याच्या दिवशी घडलेल्या एका दुःखद घटनेकडे नागपूर हिवाळी अधिवेशनात सरकारचे लक्ष वेधले. तारांकित प्रश्न विचारून सर्व हौसिंग सोसायट्यांमधील लिफ्टची तपासणी झाली आहे काय?, तसेच लिफ्टची तपासणी झालेली नसल्यास काय कारवाई करण्यात आली आहे? याची विचारणा केली आहे.आमदार जगताप यांनी विचारलेल्या या तारांकित प्रश्नांवर मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तर दिले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील सर्व लिफ्टच्या तांत्रिक तपासणीची कार्यवाही सुरू असून जिल्ह्यामध्ये लिफ्ट ऑडिट तातडीने आणि काटेकोरपणाने व्हावे यासाठी नवीन पदांची भरती करण्याबरोबरच लिफ्ट ऑडिट कामकाजाचे जिल्हास्तरीय विकेंद्रीकरण करण्यात आल्याचे उत्तरात नमूद केले आहे. सर्वसामान्यांच्या जीविताचा मोठा प्रश्न सरकारने गांभीर्याने घेतला असून, यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी म्हटले आहे.

२ ऑक्टोबर २०२५ रोजी चोविसावाडी, चऱ्होली येथील राम स्मृती सोसायटीमध्ये १२ वर्षांच्या अमेय फडतरे ह्याचा दुर्दैवी मृत्यू लिफ्ट अपघातामुळे झाला. तसेच अनेक वेळा अशा दुर्घटना होत आहेत. याकडे मंगळवारी तारांकित प्रश्न द्वारे आमदार शंकर जगताप यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लिफ्टची नियमित तपासणी न केल्यामुळे सातत्याने प्राणहानी आणि गंभीर अपघात होत आहेत. “वारंवार घडणाऱ्या या अपघातांकडे दुर्लक्ष करणा ऱ्यांवर कडक कारवाई होणे अपेक्षित असल्याचा मुद्दा आमदारांनी सभागृहात उपस्थित केला.

तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून आमदार शंकर जगताप यांनी शहरातील सर्व सोसायट्यांमधील लिफ्टची तपासणी करून प्रमाणित अहवाल सादर करावा. निकृष्ट व अप्रमाणित लिफ्ट त्वरित बंद करून शासनाच्या नियमावलीनुसार कारवाई करावी. नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकारी व बिल्डर्सवर दंडात्मक व कठोर कारवाई करावी. प्रत्येक सोसायटीमध्ये प्रशिक्षित लिफ्टमनची नियुक्ती सक्तीची करावी. लिफ्ट सुरक्षिततेसंबंधी नागरिकांसाठी जनजागृती मोहीम राबवावी. पिंपरी चिंचवड शहरातील गृहप्रकल्पांतील लिफ्टच्या सुरक्षा ऑडिटसाठी तातडीने कारवाई करावी अशी मागणी केलेली होती या मागणीच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली अशी विचारणा आमदार जगताप यांनी सभागृहात केली.



> हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी वारंवार लिफ्ट बाबत होत असलेल्या अपघातांसंदर्भात शासनाचे लक्ष वेधले. लिफ्टची तांत्रिक तपासणी होऊन त्याबाबतचा अहवाल आणि मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी होती. यानुसार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तर दिलेले आहे. सर्व गृहप्रकल्पांमधील, सोसायट्यांमधील लिफ्टची तपासणी केली जात आहे. या संदर्भात आगामी काळात सक्त उपाययोजना देखील या माध्यमातून केल्या जाणार आहेत. भाजप सरकारने सर्वसामान्यांच्या जीविताच्या दृष्टीने घेतलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड भाजपा.**